महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

शनिवार ❖ ११ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १९७ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

### तरच सामान्य माणसांचे जीवन सुकर होईल?

रविंद्र घोडविंदे

या राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या शंभर दिवसातील कारभाराची सात कलमी कार्यक्रम पत्रिका सर्व अधिकाऱ्यांना देत सरकारला अपेक्षित शेवटच्या घटकातील माणूस विकासाचा केंद्र बिंदू मानून काम करण्याचे आदेश देत सामान्य नागरिक हाच आपला विकासाचा मूळ गाभा आहे. त्याच्यासाठीच योजनाची परिपूर्ती केली जाते या माणसाला शासकीय कार्यालयात येणे नकोसे का होते आहे? याचे मूल्यमापन करा व या माणसाला घेरणारे दलाल. त्यांच्या विळख्यात अडकलेल्या योजना पारदर्शक कारभार फक्त कागदावर नको तर तो कृतीत आना त्याच समवेत सरकारी कार्यालयात येणाऱ्या माणसाला बसण्यासाठी नीट शी जागा पायाभूत सुविधासह झटपट काम करण्यासाठी जुनाट व काळबाह्य कागदपत्र हातावेगळी करा या सूचना नव्हे तर प्रतिक्ष आदेश देत या कृती आरक्षड्याची अंमलबजावणी कशी आणि कधी केली याचा आढावा एप्रिल महिन्यात घेण्यात येणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हे काम कौतुकास्पद आहे. त्याला कारण ही तसेच आहे. आज सरकारी कार्यालयात सामान्य माणूस जाण्यासाठी धजत नाही. एकीकडे ऑनलाईन कारभार आहे. तर दुसरीकडे टेबलाखालचा कारभार बिनभोबाट सुरु आहे. गावाच्या ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक असो की तलाठी असो. येथे मध्यस्थी नसेल तर चक्क्कर पे चक्कर काटावी लागते. तीच स्थिती अन्य सरकारी कार्यालयातील आहे. सामान्य माणूस येथे जाणे नकोच म्हणतो. त्याची कारणे शोधणे जशी महत्वाची तशी सरकार आणि सामान्य माणूस यांच्यातील रुदावणारी दरीं काय कामाचं तें सरकार? याच आर्त शिवा शापाने सामान्य नागरिक का करतो? याचे मूल्यमापन प्रशासनाने करणे गरजेचे आहे. सामान्य नागरिकाला वेळेवर काम होणे गरजेचे असते त्याला गतिमान सरकार अपेक्षित नाही तर त्याला वेळेवर काम महत्वाचे आहे. चक्कर पे चक्कर नकोसे आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना हेच अपेक्षित आहे. सडलेली आणि रोडावलेली शासकीय यंत्रणा यातून तरी धडा घ्यावा हीच अपेक्षा.



कल्याण शहरात उल्लेखनीय कामगिरी करत गुन्हेगारांवर वाचक ठेऊन शहराला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असलेले कल्याणचे डीसीपी श्री अतुल झेंडे यांची दै. ठाणे जीवनदीप वार्ताचे मुख्य संपादक श्री रवींद्र घोडविंदे यांनी भेट घेऊन दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या संपूर्ण टीमच्या वतीने शुभेच्छा दिल्या दिल्या

# 'महारेरा' चा बिल्डरांना दणका

## राज्यातील १९५० प्रकल्प स्थगित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

इमारतीचं बांधकाम पूर्ण करुन घरांचा ताबा देण्याची म्हणजेच पझेशनची तारीख उलटून गेल्यानंतरही 'महारेरा'कडे कोणतीही माहिती अपडेट न करणाऱ्या प्रकल्पांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरण म्हणजेच 'महारेरा'ने १० हजार ७७३ प्रकल्पांविरोधात कारवाई करत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यापैकी १९५० प्रकल्पांना स्थगिती देण्यात आली आहे. या विकासकांची बँक खाती गोठवण्यात आली आहेत. तसेच प्रकल्पाशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध घालण्यात आलेत. याशिवाय आता पुढील टप्प्यामध्ये कारणे दाखवा नोटीसला प्रतिसाद न देणाऱ्या ३४९९ प्रकल्पांवर कारवाई करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.




### कोणत्या जिल्ह्यातील किती प्रकल्प रद्द?

**स्थगित करण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी सर्वाधिक २४० प्रकल्प रायगडमधील आहेत. त्या खालोखाल स्थगित प्रकल्पांपैकी २०४ प्रकल्प ठाण्यातील आहेत. तसेच नवी मुंबई आणि उपनगरांमधील ११ प्रकल्प स्थगित करण्यात आलेत. पालघरमधील १०६ प्रकल्प स्थगित झाले आहेत. मुंबईतील ५१ प्रकल्प स्थगित करण्यात आलेत. जिल्हानिहाय विचार केल्यास छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी नागपूर आणि आहिल्यानगरमधील प्रत्येकी १ प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. ठाण्यातील २ प्रकल्प रद्द केले आहेत. साताऱ्यासहीत कोल्हापूरमधील तीन प्रकल्प रद्द करण्यात आलेत. तर नाशिक आणि मुंबई उपनगरातील प्रत्येकी ४ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. पालघरमधील ५ प्रकल्प रद्द करण्यात आलेत. रायगडमधील ६ प्रकल्प रद्द केले आहेत. सर्वाधिक म्हणजे १४ रद्द प्रकल्प हे पुण्यातील आहेत.**

### नोटीसला किती जणांनी दिलं उत्तर

मागील महिन्यात काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांना नोटीस पाठवण्यात आल्या होत्या. उत्तर देण्यासाठी निर्धारित करुन दिलेल्या ३० दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण ५३२४ प्रकल्पांनी प्रतिसाद दिला. यामधील ३५१७ प्रकल्पांनी ओसी सादर केली तर ५२४ प्रकल्पांनी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. तर प्रतिसाद देणाऱ्या कागदपत्रांची सध्या छाननी सुरु आहे. दरम्यान प्रकल्पाची थेट नोंदणी रद्द करणे किंवा स्थगित करणे प्रकल्पांवर दंडात्मक कारवाई सोबतच या प्रकल्पातील कुठल्याही सदनिकेच्या खरेदी विक्री व्यवहाराची नोंदणी न करण्याच्या सूचनांसह जिल्हा निबंधकांना देणे याशिवाय प्रकल्पांचे बँक खाते गोठवणे अशा प्रकारची कारवाई महारेराकडून केली जात आहे.

# सरकारी तिजोरीचा भार मद्यप्रेमींवर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेसह अनेक कल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. याचा परिणाम राज्याच्या तिजोरीवर होणे स्वाभाविक आहे. राज्याच्या तिजोरीवरील ताण कमी करण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील मद्य प्रेमींवर येण्याची शक्यता आहे. कारण राज्य सरकारकडून तिजोरीवरील भार कमी करण्यासाठी काही उपाय शोधले जात आहेत. याचाच भाग म्हणून राज्यातील महायुती सरकार येत्या काही दिवसात मद्य आणि सिगारेट यांच्यावरील कर वाढवण्याची शक्यता आहे. महसूलाच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवे मार्ग शोधण्यासाठी राज्य सरकारने पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे. या समितीकडून महसूल मिळवण्याचा नवीन मार्ग म्हणून मद्य उत्पादन आणि विक्रीच्या शक्यतेचा अभ्यास केला जाणार आहे. ही समिती गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली महसूल वाढवण्यासाठीच्या मद्य धोरणाच्या अभ्यास काम करणार आहे. तसेच या समितीत वित्त आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, राज्य जीएसटी आयुक्त आणि उत्पादन शुल्क आयुक्त या समितीचे सदस्य असतील. या सर्वांना एकत्रितपणे मद्य उत्पादन, मद्य विक्री परवाने, उत्पादन शुल्क आणि इतर राज्यांनी अवलंबलेल्या महसूल वाढवण्याच्या पद्धती आणि धोरणांचा अभ्यास करण्याचे काम सोपवले जाईल. या समितीकडून राज्याचे महसुली उत्पन्न वाढवण्यासाठीच्या उपायांवर शिफारसी अपेक्षित आहेत. याबरोबरच राज्य सरकार अवैध मद्य विक्री बंद करणे आणि जास्तीत जास्त मद्य विक्री परवाने वितरीत करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे.

# उल्हासनगरात भूमीगत वीज वितरण

## केंद्रीय योजनेतून १६ कोटींचा निधी मंजूर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर शहरातील वीज वितरण यंत्रणा जुनाट आणि गुंतागुंतीची आहे. त्यामुळे बिघाड झाल्यास त्यात मोठा वेळ खर्ची जातो. सर्वाधिक दाटीवाटीच्या उल्हासनगरसारख्या शहरात ही यंत्रणा भूमिगत होण्याची मागणी आता पूर्ण झाली असून केंद्राच्या संशोधित वितरण क्षेत्र योजनेतून (आरडीएसएस) या कामासाठी १६ कोटी ८४ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे या भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम लवकरच पूर्ण केले जाईल. मात्र शहरात सुरू असलेल्या भुयारी गटार आणि रस्त्यांच्या कामामुळे आधीच रस्ते खोदकामाला त्रासलेल्या नागरिकांच्या त्रासात यामुळे भर पडण्याची भीती आहे.

लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेल्या शहरांमध्ये उल्हासनगर या व्यापारी शहराचा क्रमांक लागतो. शहरातील सुमारे ६१ टक्के जागा व्यवसाय, आस्थापने, दुकाने, लहान मोठे कारखाने यांनी व्यापले आहेत. त्यात शहरात दररोज लाखो ग्राहक, व्यापारी येजा करत असतात. शहरातील अनेक रस्ते अरूंद असून रहिवासी क्षेत्रही दाटीवाटीचे आहे. यातून मार्ग काढत शहरात वीज आणि पाण्याचे वितरण केले जाते. यातील विद्युत वितरण यंत्रणा जुनी आणि गुंतागुतींची आहे. या गुंतागुंतीच्या यंत्रणेला सुरळीत करण्यासाठी स्थानिक आमदार कुमार आयलानी यांनी भूमीगत विद्युत वाहिन्या टाकण्यासाठी निधीची मागणी केली होती. त्यानुसार केंद्राच्या संशोधित वितरण क्षेत्र योजनेच्या माध्यमातून उल्हासनगर शहरातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी १६ कोटी ८४ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या माध्यमातून १७ ठिकाणी भूमीगत वाहिन्या टाकण्याचे काम करण्यात येईल. त्यामुळे या भागात विद्युत वितरण व्यवस्थेला आता निर्माण होणाऱ्या अडचणी कमी होतील, अशी आशा आहे. नुकतीच आमदार कुमार आयलानी यांच्या कार्यालयात महावितरण अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत या कामासाठीची तांत्रिक प्रक्रिया, महापालिकेकडून आवश्यक परवानग्या आणि कामाचे नियोजन यावर चर्चा झाली.

# मुंबई महापालिकेला वितरकांचा अल्टिमेटम

## देयके मंजूर न झाल्यास १३ जानेवारीपासून औषध पुरवठा बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : वैद्यकीय महाविद्यालये, उपनगरीय रुग्णालये आणि दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करणाऱ्या वितरकांची सुमारे १२० कोटी रुपयांची देयके मुंबई महानगरपालिकेने चार महिन्यांपासून थकवली आहेत. देयके थकवल्यामुळे वितरकांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे. परिणामी, वितरकांनी तातडीने देयके मंजूर न झाल्यास १३ जानेवारीपासून औषधांचा पुरवठा बंद करण्याचा इशारा मुंबई महानगरपालिकेला दिला आहे. मुंबई महानगरपालिकेने मागील वर्षभरापासून वैद्यकीय महाविद्यालये, उपनगरीय रुग्णालये, प्रसूतिगृह, दवाखान्यांमध्ये शून्य औषध चिठ्ठी योजना राबविण्याची केवळ घोषणाच केली. शून्य औषध चिठ्ठीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे प्रशासनाला शक्य होत नसल्याने ही योजना वारंवार पुढे ढकलली जात आहे. मात्र सध्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध करण्यात येणाऱ्या औषधांची जवळपास १२० कोटींची देयके मागील चार महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे उघडकीस आले आहे. यांसदर्भात औषध वितरकांकडून वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही औषधांची देयके मंजूर झालेली नाहीत. त्यामुळे औषध वितरकांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. रुग्णांचे हाल होऊ नयेत यासाठी वितरकांकडून मागील काही महिन्यांपासून सहकार्याची भूमिका घेतली होती. मात्र वारंवार पाठपुरावा करूनही देयके मंजूर केली जात नाही. औषधांची देयके तातडीने मंजूर करण्यात यावीत, अन्यथा १३ जानेवारीपासून मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांचा औषध पुरवठा बंद करण्याचा निर्णय औषध वितरकांनी घेतला आहे. दरम्यान, औषध वितरकांनी प्रलंबित देयकांसंदर्भातील पाठवलेले पत्र प्रशासनाला मिळाले आहे. याबाबत सविस्तर माहिती घेण्याचे काम सुरू असल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे उप आयुक्त संजय कुऱ्हाडे यांनी सांगितले.

# परफ्युमच्या बाटल्यांचा स्फोट

## चार जण होरपळून जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : नालासोपारा पूर्वेच्या शंकेश्वरनगर मधील एका इमारतीत परफ्यूमवरील (ईंल्सि) तारखा बदलण्याचे काम सुरु असताना अचानक स्फोट झाल्याची घटना घडली आहे. गुरुवारी रात्री पावणे नऊच्या सुमारास ही घटना घडली यात एकाच कुटुंबातील चार जण होरपळून जखमी झाले आहेत. मात्र, परफ्युमच्या बाटल्यांचा असा स्फोट झाल्याने शेजारील नागरिकही भयभीत झाल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, या घटनेचा तपास केला जात असून नेमकं स्फोट होण्याचं कारण शोधण्यात येत आहे.

नालासोपारा पूर्वेच्या शंकेश्वर नगर परीसरात ही घटना घडली आहे. या ठिकाणी असलेल्या रोशनी अपार्टमेंट इमारतीत मधील ११२ क्रमांच्या सदनिकेत वडर कुटुंब राहते. गुरुवारी रात्रीच्या सुमारास परफ्युम बॉटलवरील तारखा संपल्या होत्या. त्या बदलण्याचे काम सुरु होते. याच दरम्यान अचानकपणे स्फोट झाला. परफ्यूम मध्ये असलेल्या गॅसमुळे स्फोटात घरातील चार जण होरपळून जखमी झाले आहेत. यात महावीर वडर (४१), सुनीता वडर, हर्षवर्धन वडर (९), हर्षदा वडर (१४) अशी जखमींची नावे आहे. या दुर्घटनेत पती-पत्नीसह कुटुंबातील दोन मुले असे एकूण ४ जण जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती पालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळताच घटनास्थळी पोहचून परिस्थिती नियंत्रणात आणली. तर जखमींना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. मुलगा हर्षवर्धन याच्यावर नालासोपारा येथील लाईफ केयर रुग्णालय तर अन्य ३ जणांवर ओस्कर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# तालुका पातळीवर कृषी प्रदर्शनांची गरज – कृषीमंत्री माणिकराव कोकाटे

## कृषीमंत्र्यांच्या हस्ते अकोले येथे कळस कृषी व डेअरी प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अकोले** - शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी स्थानिक युवकांनी एकत्र येत तालुका पातळीवर कृषी प्रदर्शन भरविण्याची गरज आहे, अशा प्रदर्शनांना शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले. अकोले येथे विठ्ठल लॉन्स येथे आयोजित कळस कृषी व डेअरी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिलीपराव शिंदे, आबासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, ॲड वसंतराव मनकर , अगस्ति कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रकाश नवले, द्राक्ष बागायतदार संघटनेचे कैलासराव भोसले, पाणी फाऊंडेशनचे अविनाश पोळ, कळस तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष नामदेव निसाळ, छत्रपती युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष संदीप वाकचौरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

कृषीमंत्री श्री.कोकाटे म्हणाले, आतापर्यंत कृषी अवजारांची प्रदर्शने पाहिली आहेत. आज प्रथमच प्रत्यक्ष पीकांच्या शेतीसह असलेले प्रदर्शन पहात आहे. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून तरूणांना शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्याचे ज्ञान प्राप्त होते. आज महाराष्ट्रात एका पीकांचे वेगवेगळे २०० प्रकारांच्या वाणांचे संशोधन झाले आहे. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात मिळाला पाहिजे यावर शासनाचा भर आहे. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आली पाहिजे यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

तरूणांना शेती क्षेत्राकडे वळविण्यासाठी या क्षेत्रात नवनवीन प्रयोग करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक खत व बियाणे न वापरता, प्रमाणित केलेली खते व बियाणे अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी केली पाहिजेत, असे आवाहनही त्यांनी केले. शेतकऱ्यांनी नकारात्मक होऊन खचून जाऊ नये, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही ना. कोकाटे यांनी यावेळी दिली.

रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना पिकानुसार मजुरीचा खर्च देण्याबाबत केंद्रीय कृषी मंत्र्यांशी चर्चा करून याबाबत चांगला निर्णय घेण्याचे ना. कोकाटे यांनी सांगत शेतकऱ्यांना फसविणाऱ्या बियाणे, खते, औषध्याच्या कंपन्यांवर कारवाई करण्याचा इशारा ना.कोकाटे यांनी दिला. बियाणे, औषधाचे किंमती बाबद वास्तविकता तपासण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमानंतर कृषीमंत्र्यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉलला भेट देत पिकांच्या नवनवीन वाणांची माहिती जाणून घेतली. प्रास्ताविक व स्वागत कळस कृषी प्रदर्शन समितीचे संयोजक सागर वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन सदानंद चव्हाण यांनी केले तर आभार कळस चे माजी सरपंच भाऊसाहेब वाकचौरे यांनी मानले.



## गीतासार



**योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः । धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः । १-२३ ।**

**अर्थ**

दुष्टबुद्धी दुर्योधनाचे युद्धात हित करू इच्छिणारे जे जे हे राजे या सैन्यात आले आहेत, त्या योद्धयांना मी पाहातो. । १-२३ ।

**सञ्जय उवाच**
**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम । १-२४ ।**
**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम ।**
**उवाच पार्थ पश्यैतान समवेतान कुरुनिति । १-२५ ।**

**अर्थ**

संजय म्हणाले, धृतराष्ट्र महाराज, अर्जुनाने असे सांगितल्यावर श्रीकृष्णांनी दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी भीष्म, द्रोणाचार्य व इतर सर्व राजांच्या समोर तो उत्तम रथ उभा करून म्हटले, हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), युद्धासाठी जमलेल्या या कौरवांना पाहा. । १-२४, १-२५ ।

## आरोग्य टिप्स

### फ्रिजमध्ये ठेवलेले अन्न वारंवार गरम करता मग हे पहा



**पोषक तत्वांचे नुकसानः** वारंवार गरम केल्याने अन्नातील जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारखे पोषक घटक नष्ट होतात.

**बॅक्टेरियाचा धोकाः** अन्न व्यवस्थित झाकले नाही किंवा फ्रिजमध्ये जास्त वेळ ठेवल्यास त्यात बॅक्टेरिया वाढू शकतात. हे जीवाणू वारंवार गरम केल्याने मारले जात नाहीत आणि अन्नासह आपल्या शरीरात प्रवेश करू शकतात.

**पचनाच्या समस्याः** वारंवार गरम केलेले अन्न पचण्यास कठीण असते आणि त्यामुळे पचनास त्रास होऊ शकतो.

**चवीत बदलः** वारंवार गरम केल्याने अन्नाची चव आणि पोत बदलतो.

**पालेभाज्याः पालेभाज्यांमध्ये नायट्रेट्स असतात जे वारंवार गरम केल्यावर नायट्रेट्समध्ये बदलतात.**

**थंड करून साठवाः** उरलेले अन्न थंड करून हवाबंद डब्यात साठवा.


**त्वरीत पुन्हा गरम कराः** उरलेले त्वरीत पुन्हा गरम करा आणि एकदाचगरम करा.

**योग्य प्रकारे गरम कराः** अन्न पूर्णपणे गरम करा जेणेकरून सर्व जीवाणू नष्ट होतील.

**उरलेल्या अन्नाची त्वरीत विल्हेवाट लावाः** उरलेले अन्न जास्त काळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नका.

अन्न वारंवार गरम करणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. म्हणून, उरलेले अन्न शक्य तितके कमी गरम करा आणि ते लवकर संपवण्याचा प्रयत्न करा. निरोगी राहण्यासाठी ताजे अन्न खाणे चांगले.

# अचानक टक्कल पडणाऱ्या गावातील पाण्याचा अहवाल








बुलढाणा जिल्ह्यातील सहा गावांमध्ये सध्या भीतीचं वातावरण आहे. या गावातील काही रुग्णांना अचानक टक्कल पडू लागलं आहे.

बुलढाणा जिल्ह्यातल्या शेगाव तालुक्यात असणाऱ्या बोंडगाव, कालवड आणि कठोरा या गावांमध्ये केस गळतीच्या आजाराची दहशत पसरली आहे.

स्थानिक आरोग्य विभागानं या बाबतीत सर्वेक्षण करून, अचानक सुरू झालेल्या या केसगळतीची कारणं शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

रुग्णांना एकदा केसगळती सुरू झाली की काही दिवसांमध्ये संपूर्ण टक्कल पडत असल्याची तक्रार या गावातील नागरिकांनी केली आहे.

या गावांमध्ये राहणारे सुमारे ५०-५५ नागरिकांना या आजाराची लागण झाल्याचं वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

या आजाराची लागण झाल्यानंतर आधी डोक्याला खाज येते आणि नंतर थेट केस हातात येऊ लागतात आणि तिसऱ्या ते चौथ्या दिवशी टक्कल पडत असल्याची तक्रार रुग्णांनी केली आहे.

हे नेमकं का होतंय या प्रश्नाचं उत्तर अजूनही मिळत नसलं, तरी स्थानिक डॉक्टरांनी या रुग्णांवर प्राथमिक उपचार सुरू केले आहेत.

केसगळतीचा त्रास झालेले रुग्ण काय म्हणाले?

शेगाव तालुक्यातील सहा गावांमध्ये हा त्रास प्रामुख्याने आढळून आल्याचं वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं.

अनेक नागरिकांनी केसगळतीची तक्रार केल्यानंतर भोनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्वचारोगतज्ञ आणि इतर डॉक्टरांनी पाहणी केली.

या रुग्णालयात डोक्याच्या त्वचेचे नमुने देण्यासाठी आलेल्या रुग्णांनी त्यांचे अनुभव सांगितले.काहीजणांनी काही विशिष्ट कंपन्यांचे शाम्पू वापरल्यानंतर हा त्रास सुरु झाल्याचं सांगितलं आहे. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अहवाल येईपर्यंत नेमकं कारण सांगता येणार नसल्याचं स्पष्टीकरण दिलं.

वानखडे ग्रामीण आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी आदरट यांनी बीबीसी मराठीला सांगितलं, 'मी या गावांमधील सात ते आठ रुग्णांची तपासणी केली आहे. बाकीचे रुग्ण तपासणीसाठी स्वतःहून तयार झाले नाहीत. मी ज्या रुग्णांची तपासणी केली त्यांच्या टाळूवर काही पॅचेस होते आणि रुग्णांच्या डोक्याला खाज सुटली होती.'

'नव्वद टक्के रुग्णांनी डोकं खाजवत असल्याची तक्रार केली होती. अशी बहुतांश रुग्णांना हिवाळ्यामध्ये होणाऱ्या टीनिया कॉर्पोरीस, टीनिया कॅपेटीस, पिटिरीयासीसी कॅपेटीस अशा आजारांची लागण झाल्याचं दिसून आलं. यासोबतच आम्ही या गावांमधील पाण्याचे नमुने तपासणीसाठी रासायनिक प्रयोगशाळे पाठवले आहेत.'

डॉ. आदरट म्हणाले, 'आम्ही रुग्णांच्या त्वचेची तपासणी करणार आहोत. त्यामध्ये रुग्णांच्या डोक्याच्या त्वचेचा ३मिलीमीटरचा तुकडा काढून तपासणीसाठी पाठवला जातो. त्या तपासणीचा निकाल आल्यानंतर आम्ही उपचार करणार आहोत. माझ्या कारकिर्दीत पहिल्यांदाच असं घडलं आहे त्यामुळे तपासणीचे अहवाल आल्याशिवाय नेमकं कारण सांगता येणार नाही. बऱ्याचदा कुटुंबात एकच टॉवेल, कंगवा वगैरे वापरल्यामुळे हा आजार पसरतो.'

ज्या रुग्णांना हा त्रास झाला त्यापैकी काही जणांनी त्यांच्या त्वचेचे नमुने दिले आहेत.

केसगळीतचा त्रास झालेले भोनगावचे रहिवासी दिगंबर इलामे म्हणाले, 'माझे केस चालले म्हणून दवाखान्यात दाखवण्यासाठी आलो. मी एक दिवस पांढऱ्या रंगाच्या पॉकेट मधला शाम्पू लावला होता त्यामुळे केस चालले होते. मला दुसऱ्या कोणत्या कारणामुळे केस चालले आहेत असं वाटत नाही. याआधी कधीच आमच्या गावात अशा पद्धतीने केसगळती झाली नाही.'

'आमच्या गावात सुमारे २५ लोकांना हा त्रास होतो आहे. पहिल्यांदा एक दिवस डोक्याला खाज सुटते आणि मग केस गळू लागतात. मला मोठं टक्कल पडलं होतं पण आता पुन्हा केस येऊ लागले आहेत. आमच्या गावात खारट पाणी येतं, त्यामुळेही असं होऊ शकतं. डॉक्टरांनी अजून याचं कारण शोधून काढलेलं नाही. पाण्याचे नमुने घेऊन दहा दिवस झाले पण अजून रिपोर्ट आला नाही.'

केसगळीतला घाबरून काहीजणांनी थेट टक्कल करण्याचा निर्णय घेतला. टक्कल केल्यानंतर डोक्याची खाज कमी झाली आणि पुन्हा केस नियमित वाढू लागले असंही एका रुग्णाने सांगितलं.

केसगळतीचा त्रास सुरु झाल्यानंतर टक्कल केलेले मारुती इलामे म्हणाले, 'आठ ते दहा दिवसांपूर्वी मला केसगळतीचा त्रास सुरु झाला. डोकं खाजवू लागलं आणि मग मी टक्कल केलं. केस एवढे गळत होते की, केसाचं पुंजकच हातात येत होतं.'

'आता डोक्याची खाज बंद झाली आहे आणि पुन्हा केस वाढत आहेत. टक्कल केल्यापासून डोक्याला कसलाही त्रास नाही. मी कसलाच शाम्पू वापरत नाही, आता हे पाण्यामुळे झालं की काय काय माहिती? आता डॉक्टरच काय ते सांगतील. गावातील वीसेक लोकांना हा त्रास होतोय. '

**पाण्यात नायट्रेटचं प्रमाण जास्त**

भोनगाव येथील पाण्याचे नमुने तपासल्यानंतर बोलताना बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते म्हणाले, 'प्राथमिक तपास केल्यानंतर आम्ही या गावांमधले पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले होते. सामान्यतः पाण्यातील नायट्रेटचं प्रमाण हे दहाच्या आत असायला पाहिजे. परंतु जे पाणी आम्ही पाठवलं त्यामध्ये तब्बल ५४ मिलिग्रॅम प्रति लिटर एवढं जास्त प्रमाण आढळून आलं आहे.'

'पाण्यातील लीड आणि अर्सेनिकच्या तपासणीसाठी आम्ही ते नमुने पुणे इथे पाठवले आहेत. आठ ते दहा दिवसांमध्ये त्याचेही निकाल येतील. पाण्यातील रसायनांचं प्रमाण एवढं असल्यामुळे नागरिकांमध्ये वेगवेगळे आजार दिसून येतायत.'

केसगळतीबाबत बोलताना गीते म्हणाले, 'आता केसगळती यामुळेच झाली असं म्हणता येणार नाही. आम्ही वैद्यकीय तपासणीत फंगल इन्फेक्शनमुळे हे झाल्याचं दिसत आहे. या ठराविक भागामध्येच हा संसर्ग कसा पसरला हेही आम्ही तपासणार आहोत. ज्यांचे केस गेले होते त्यांचे केस उगवायला पुन्हा एकदा सुरुवात झाली आहे.'

'नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नसल्याचं गीते म्हणाले. या गावांमध्ये राहणाऱ्या महिलांना जास्त भीती वाटत होती मात्र आम्ही त्यांना समजावून सांगितलं आहे. या भागातील नागरिकांनी पाणी शुद्ध करून प्यायला हवं. असं दूषित पाणी पिल्यामुळे अनेक आजार होऊ शकतात. त्यामुळे हे पाणी आहे तसं पिण्यासाठी आयोग्य आहे असाच अहवाल माझ्याकडे आला आहे,' असं डॉ. गीते यांनी सांगितलं.

**गावात गोडं पाणीच नाही**

भोनगाव हे गाव खारपाणपट्ट्यात येतं. त्यामुळे या गावात गोड्या पाण्याचे साठे कमी आहेत. याबाबत बोलताना सरपंच रामा पाटील थारकर म्हणाले, 'गेल्या १० दिवसांपासून माझ्या गावात एक अजब आजार पसरलेला आहे. आधी एका कुटुंबातल्या व्यक्तीला या आजाराची लागण झाली, त्यानंतर त्याचं कुटुंब आणि आता गावभर हा आजार पसरला आहे. लोकांची केसगळती होत आहे.'

'या आजारामुळे गावात भीतीच वातावरण आहे. गावातील जवळपास वीस रुग्णांना टक्कल पडलं आहे. एकदा केसगळती सुरु झाली की पाच ते सहा दिवसांमध्ये पूर्ण टक्कल पडत आहे. याबाबत आम्ही आरोग्य विभागाला पत्र दिलेलं आहे.'

थारकर म्हणाले, 'हे गाव खारपाणपट्ट्यातल आहे त्यामुळे गावात गोडं पाणी येत नाही. रोजच्या वापरासाठी आम्ही ट्यूबवेल खणल्या आहेत आणि पिण्याच्या पाण्याचे टँकर मागवावे लागतात. खाऱ्या पाण्यामुळे अनेकांना किडनीचे आजार झाले आहेत.

आम्ही तात्काळ उपचार सुरु केले आहेत, नेमकं काय झालंय ते तपासणीनंतरच कळेल.

शेगाव तालुक्यातील सहा गावांनी या आजाराची तक्रार केल्यानंतर. बुलढाण्याचे जिल्हा वैद्यकीय अधिकारी अमोल गीते यांनी यापैकी काही गावांना भेटी दिल्या. प्राथमिक पातळीवर फंगल इन्फेक्शन झाल्यामुळे हा त्रास झालेला असू शकतो असं ते म्हणाले. या सगळया गावांमध्ये सध्या भीतीच वातावरण आहे. मात्र काही रुग्णांनी हा त्रास कमी झाल्याचंही सांगितलं आहे. गावातल्या नागरिकांमध्ये कोरोनासारखा एखादा विषाणूमुळे हा आजार पसरल्याच्या किंवा विशिष्ट कंपनीचा शाम्पू वापरल्यामुळे टक्कल पडत असल्याचा चर्चा सुरु आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मात्र घाबरून न जाण्याचं आवाहन केलं आहे.




# लालबहादूर शास्त्री स्मृतिदिन

## (२ ऑक्टोबर १९०४ - ११ जानेवारी १९६६)



भारतीय लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक व भारतीय प्रजासत्ताका चे दुसरे पंतप्रधान म्हणून ज्यांची १८ महिन्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली, देशासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्यासाठी ज्यांना 'भारतरत्न पुरस्कार' बहाल केला गेला अशा माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची प्रेरणादायी जीवन यात्रा आपण पाहूया. त्यांचा जन्म रेल्वे टाऊन, मुगलसराय, वाराणसी या ठिकाणी २ ऑक्टोबर १९०४ रोजी झाला. अत्यंत गरीब परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी काशी विद्यापीठाची सन १९२५ मध्ये' शास्त्री' ही पदवी मिळवली. त्यांचे वडील शारदा प्रसाद हे शिक्षक होते. आणि आईचे नाव होते राम दुलारीदेवी. ललिता देवी ह्या त्यांच्या पत्नी होत. १९२७ मध्ये लाला लजपतराय यांनी स्थापन केलेल्या 'द सर्व्हन्टस ऑफ द पीपल्स सोसायटी' चे ते सदस्य झाले. १९२९ पासून ते पंडित नेहरूंच्या सहवासात आले आणि देशाच्या सर्वोच्च राजकीय वर्तुळात लाल बहादूर यांचा समावेश झाला. तसेच महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. त्यांनी नऊ वर्ष तुरुंगात काढली. शास्त्रीजी अनेक वर्ष काँग्रेसचे पदाधिकारी राहिले. नेहरू मंत्रिमंडळात मंत्री बनले. पंतप्रधान झाले, पण आश्चर्याची बाब म्हणजे या पंतप्रधानांकडे स्वतःच्या मालकीची एक ही मोटार नव्हती. नंतर एक गाडी विकत घेतली. त्यांच्या निधनानंतरही त्या गाडीचे अनेक हप्ते भरणे बाकी होते. स्त्रियांचे स्वावलंबन व अस्पृश्यांना नवी संधी मिळण्यासाठी ते आयुष्यभर झटले.

कायदेभंगाची चळवळ व भारत छोडो आंदोलन यामध्ये लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्याप्रमाणे स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन शास्त्रीजीं नी १९३० ते १९४५ या काळात सात वेळा तुरुंगवास भोगला. १९५६ साली ते रेल्वेमंत्री झाले. रेल्वेमंत्री असताना रेल्वे अपघात झाला. त्यांनी त्वरित पदत्याग केला. शास्त्रीजींच्या जाहीरनामा सारखे नैतिकता पालनाचे सर्वोच्च उदाहरण दुसरे कुठलेही नसेल. ९ जून १९६४ रोजी त्यांनी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली. १९६५ ला पाकिस्तानशी झालेल्या युद्धामध्ये त्यांनी संपूर्ण देशाला लढ्याची हाक दिली.' जय जवान जय किसान' या महामंत्राचा घोष केला अत्यंत कठीण काळी राष्ट्राचे कुशल पणे नेतृत्व केले.

जबाबदारी पाळण्यात त्यांनी कुठेही कसर ठेवली नाही. पंतप्रधानपदी असताना सोवियत संघाच्या मध्यस्थीने पाकिस्तान बरोबर युद्ध बंदीचा करार ताश्कंद (सोवियत संघ) येथे ते गेले होते. सदर दौऱ्यावर असताना १० जानेवारी १९६६ रोजी ते अत्यवस्थ झाले दुर्दैवाने ११ जानेवारी रोजी त्यांचे देहावसान झाले. लालबहादूर शास्त्रीजीं नी देशासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्यासाठी त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. लालबहादूर शास्त्री मार्ग (सायन ते मुलुंड मुंबई) आग्रा रोड नाव देण्यात आले आहे. तसेच लाल बहादूर शास्त्री मार्ग (नवा एटी फिट रोड) पुणे स्वारगेट रस्ता असे नाव देण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी (एल बी एस एन ए ए) मसुरी, डेहराडून, उत्तराखंड वगैरे त्यांच्या स्मरणार्थ नावे देण्यात आलेली आहेत. देशहितकारक, शीलवान, चारित्र्यवान असे उत्तुंग व्यक्तिमत्व लाभलेल्या शास्त्रीजी यांना मानाचा मुजरा।




# शाकंभरी नवरात्र उत्सव निमित्त ६४ भाज्यांची आरास

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, पारनाका, कल्याण पश्चिम (दिंडोरी प्रणित) येथे शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त ६४ भाज्यांची आरास साकारण्यात आली. शाकंभरी नवरात्र उत्सव निमित्त कल्याण पारनाका स्वामी समर्थ सेवा केंद्रात ७ जानेवारी ते १३ जानेवारी या कालावधीत रोज मोठ्या संख्येने दुर्गा सप्तशतीचे पाठ होत असल्याचे केंद्र प्रतिनिधी स्वाती पाचघरे यांनी सांगितले.




# किशोरवयीन मुलींनी मेकअप आणि त्वचेची काळजी कशी घ्याल



या वयात किशोरवयीन मुली मेकअप आणि त्वचेची काळजी घेण्याबद्दल खूप उत्साही आणि उत्साही असतात. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या मुलींशी याबद्दल बोलणे आणि त्यांना मेकअपच्या आरोग्यदायी सवयी किंवा टिप्सबद्दल योग्य माहिती देणे महत्त्वाचे आहे. आज या लेखात आम्ही तुम्हाला अशाच काही टिप्सबद्दल सांगत आहोत.

**मेकअप करण्यासाठी योग्य वय कोणते आहे**

या वयात मेकअपसाठी त्वचा नवीन असते. अशा परिस्थितीत हेवी प्रॉडक्टच्या वापरामुळे ते खराब होण्याची शक्यता असते. किशोरवयीन त्वचेवर मेकअप सहसा १५-१६ पासून सुरू केला जाऊ शकतो. हे लक्षात ठेवले पाहिजे की मेकअप खूप हलका असावा कारण हेवी मेकअपमुळे त्वचेवर पिंपल्स इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

**किशोरवयीन मुलींनी योग्य उत्पादने कशी निवडावी?**

किशोरवयीन त्वचा मेकअप उत्पादनांसाठी नाजूक आणि संवेदनशील असते. रासायनिक उत्पादनांच्या अतिवापरामुळे त्वचेचे नुकसान होऊ शकते. परंतु योग्य उत्पादनांचा योग्य प्रमाणात वापर केल्यास त्वचेला कोणतीही हानी होत नाही. पौगंडावस्थेमध्ये मुरुम किंवा मुरुम येणे देखील सामान्य आहे. सुरुवातीला फुल कव्हरेज कंसीलर वापरा आणि तुमच्या त्वचेनुसार कॉम्पॅक्ट करा. ताजे लूक मिळविण्यासाठी, स्मजफ्री काजळ आणि लिप बाम किंवा लिप ग्लॉस लावा.

**तुमच्या किशोरवयीन मुलींना योग्य मेकअप कसा समजवायचा** - नाजूक त्वचेवर मेकअपचा वापर केल्याने भविष्यात त्यांची त्वचा खराब होऊ शकते याची जाणीव पालकांनी मुलांना करून दिली पाहिजे. किशोरवयीन मुलांसाठी, तसेच त्यांच्या पालकांसाठी हे समजून घेणे खूप महत्वाचे आहे की किशोरवयीन मेकअप प्रौढांपेक्षा वेगळा आहे. अनेकदा किशोरवयीन मुली कुटुंबातील मोठ्याचे मेकअप प्रोडक्ट वापरायला लागतात, जे योग्य नाही.

# म्हसा यात्रेसाठी प्रशासन सज्ज

## एचएमपीव्हीच्या धर्तीवर काळजी घेण्याचे आवाहन!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुरबाड तालुक्यातील प्रसिद्ध म्हसोबा अर्थात खांबलिंगेश्वर यात्रेला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असताना याकरिता प्रशासन देखील सज्ज झाले आहे. शिवाय नवीन आलेल्या एच एम पीव्ही विषाणू च्या धर्तीवर येणाऱ्या यात्रेकरूंनी काळजी घेण्याचे अवाहन मुरबाड पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी श्री लोहकरे यांनी केले आहे.

तालुक्यातील म्हसा यात्रेला १५०ते २००वर्षाची पंरपरा आहेयेत्या१३जानेवारी पासून ही यात्रा सुरू होत आहे., याकरिता संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातून देखील, छोटे मोठे व्यापारी, यात्रेकरू येत असतात, राज्यातील एकमेव ही यात्रा भरते, जी १०ते १५दिवस चालते, लाखोंचा जनसमुदाय येथे येत असतो, यामुळे येथील ग्रामपंचायत, पंचायत समिती, पशुसंवर्धन, बांधकाम, महसूल आणि पोलीस यंत्रणेवर कमालीचा ताण येतो. त्यामुळे हे दूर करण्यासाठी येथील आमदार किसन कथोरे यांनी काही दिवस अगोदरच सर्व विभागांची बैठक घेऊन नियोजन केले आहे.



या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे, बैलबाजार, घोंगडी बाजार,संसार उपयोगी साहित्य, खेळणी पाळणे, लोककला, मनोरंजन, आदी मुळे ही यात्रा अनेक दिवस चालते,

या बाबतीत नियोजन करताना प्रशासनाची दमछाक होते, तरीही मुरबाड पंचायत समिती व म्हसा ग्रामपंचायत यांच्या वतीने ८टिम तयार करण्यात आल्या आहेत, प्रत्येक टिम मध्ये ३/३ अशी २५कर्मचारी नेमणूक केली आहे,एक टिम रिजर्व ठेवण्यात येणार आहे, यासाठी

३ग्रामसेवक, यावर देखरेख करणार आहेत, यांना वेग वेगळा एरिया(विभाग)दिला आहे,१०शौचालये, रुग्णवाहिका, पुरेसा औषध साठा,२४तास आरोग्य कक्ष, पुरेसा टिसीएल साठा, धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी टँकर ची सोय, पाणी शुध्दीकरण, कचरा, इत्यादी विषय त्या त्या विभागाला सूचाना देण्यात आल्या आहेत, तसेच अंत्यत महत्त्वाचे म्हणजे, सध्या राज्यात नवीन आलेल्या एच एम पीव्ही विषाणू ची भिती पसरली आहे, हा तितका भंयकर नसला तरी, येणाऱ्या यात्रेकरूंनी मास्क वापरले, स्वतः ची काळजी घेणे गरजेचे आहे असे मत श्री लोहकरे यांनी व्यक्त केले आहे. तसेच यात्रेकरीता येणारे लाखो लोक आणि त्या मानाने मनुष्यबळ कमी त्यामुळे प्रशासनावर ताण येणार असेही ते म्हणाले,त्यामुळे येणाऱ्या भावीकांनी देखील प्रशासनाला सहकार्य करून म्हसा यात्रेचे पावित्र्य राखावे असे अवाहन प्रशासनाने केले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत गुणदर्शन स्पर्धांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

दि.१० - जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षण विभाग प्राथमिक आयोजित जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा २०२४-२५, एन. के. टी. सभागृहात आज, दि. १० जानेवारी, २०२५ रोजी पार पडला. मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर येथील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाची उंची वाढवली.

विद्यार्थ्यांना कला सादर करताना पाहून आनंद होतो त्यामुळे अशा कार्यक्रमांना उपस्थित राहणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणे आणि प्रोत्साहन देण्यासाठी आजचा हा मंच प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांचे आत्मसन्मान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नाट्य, गीत, समुह गीतं, समुह नृत्य अशा विविध कलागुणांना उंचावर घेऊन जाण्यासाठी विशेष शिक्षकांनी मोलाची भुमिका बजावली आहे. या स्पर्धेसाठी उपस्थित सर्वांना शुभेच्छा मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी यावेळी दिल्या.



> प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांचे आत्मसन्मान उंचावण्यासाठी विविध गुणदर्शन स्पर्धा महत्त्वाची
> -मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत सेस फंडातून जिल्हा स्तरावरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने शिक्षण विभागाच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा आपण दरवर्षी आयोजित करतोय. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मंच देण्यासाठी आणि विविध गुण सादर करण्यासाठी ही स्पर्धा मोलाची आहे असे शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे यांनी प्रास्ताविक करताना मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्राथमिक विभागातील कार्यक्रम उत्तमरित्या सादर केले जात आहेत. यासाठी शिक्षकांनी घेतलेली मेहनत मोलाचे आहे. सर्व विद्यार्थ्यांना सदिच्छा शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले यांनी दिल्या.

# ‘मल्लखांबाचे महत्व’ या विषयावर जीवनदीपच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/गोवेली(प्रतिनिधी):

आजच्या डिजिटल युगात वाढत्या सोशल मीडियाच्या वापरामुळे आजची पिढी मोबाईलचा अतिवापर करताना दिसून येते. त्यामुळे त्यांचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता वाढली आहे. आणि म्हणूनच या साऱ्याचा विचार केला असता विद्यार्थ्यांना मानसिक दृष्ट्या प्रबळ करण्यासाठी तसेच शारीरिक दृष्ट्या मजबूत करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे आज दि ९ जानेवारी





२०२५ रोजी मल्लखांब क्षेत्रातील प्रमुख , पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेले मा.उदय देशपांडे यांचे मार्गदर्शन आयोजिले होते. यावेळेस त्यांनी विद्यार्थ्यांना आजच्या घडीला मैदानी खेळांचे महत्त्व समजावत शरीरातील विविध क्षमता विकसित करण्यासाठी मल्लखांब किती उपयुक्त आहे याचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्याचा आपल्या आरोग्यावर होणारा परिणाम त्याचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळेस त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांकडून मल्लखांब चे विविध प्रकार, आसन प्रात्यक्षिक रित्या करून घेतले.

तसेच त्यांची विद्यार्थिनी प्रचिती देसाई,शरयू केणे यांनी देखील विद्यार्थ्यांना मल्लखांब प्रात्यक्षिकरित्या करून दाखवलं. त्याचबरोबर जेष्ठ गिर्यारोहक प्रवीण पाटील यांनी देखील विद्यार्थ्यांना मल्लखांब विषयी मार्गदर्शन केले त्यात त्यांनी विद्यार्थ्यांना मल्लखांब चा इतिहास सांगितला. यावेळेस जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्रा. डॉ के बी कोरे,उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला .

# ‘जननी’ नातं एक रंग अनेक

## आई आणि मुलगी यांच्यातील गुरू शिष्य परंपरेचे ऋणानुबंध






दै.ठाणे जीवनदीप वार्ता
बदलापूर(प्रतिनिधी):

बदलापुरातील कथक नृत्य शिकवणारी संस्था,पदन्यास कथक इन्स्टिट्यूटचे हे दहावे वष.र्या निमित्ताने जननी फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. एनसीपीए मुंबई डान्स सीजन, आदर्श विद्यामंदिर आणि टाटा इन्व्हेस्टमेंट यांच्या सौजन्याने पदन्यास संस्थेने १९ जानेवारी रविवार संध्याकाळी ५ वाजता आदर्श विद्या मंदिर ऑडिटोरियम मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.अभिजात शैलीमध्ये गुरु - शिष्य परंपरेला एक स्थान आहे. आई मुलगी तिच गुरु शिष्य असताना असे ऋणानुबंध नृत्यद्वारे कसे व्यक्त होतात याची प्रचिती आपल्याला या कार्यक्रमातून बघायला मिळेल. भरतनाट्यम डॉक्टर उमा रेळे आणि डॉक्टर वैदेही रेळे - लाल, भरतनृत्यम डॉक्टर जयश्री राजगोपालन आणि श्रीमती ऐश्वर्या हरीश, ओडिसी श्रीमती मिताली डिसोजा आणि दिया डिसूजा, कथक श्रीमती गायत्री भट आणि सुहानी भट सादर करतील. या कार्यक्रमाद्वारे शास्त्रीय नृत्य शैलीचे वैविध्यही बघायला मिळेल. प्रवासाला लागणारा वेळ आणि गर्दी यामुळे रसिकजनांना आणि नृत्य अभ्यासकांना मुंबईला जाऊन कार्यक्रम बघणे शक्य होत नाही. आणि यासाठीच पदन्यास कथक इन्स्टिट्यूटने एनसीपीएच्या मुंबई डान्स सीजन द्वारे बदलापूर रसिकांसाठी ही नृत्य पर्वणी आयोजित केली आहे. प्रत्येकाने ह्या कार्यक्रमाचा आनंद जरूर घ्यावा. कारण सर्वांसाठी सदर कार्यक्रम विनामूल्य आहे.

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्राईल येथे रोजगाराची संधी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी):

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यातील उमेदवारांना, इस्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली आहे.इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या, वय वर्षे २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहायक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाव्दारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक (including OJT) आहे. भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवायफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिका-यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/ एएनएम/ जीएनएम/ बीएससी नर्सिंग / पोस्ट बीएससी नर्सिंग (GDA/ANM/GNM/Bsc Nursing/Post Bsc Nursing) ची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.या संधीचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक माहिती व नोंदणीसाठाr www.maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त शैलेश भगत यांनी केले आहे.

# पालघर येथे महिला मेळावा व लोकप्रतिनिधी प्रशिक्षण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(ऋषीकेश जाधव)

पालघर/ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पालघर अंतर्गत महिलांसाठी विशेष मेळावा व लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत वेढी हद्दीतील वीट भट्टीवर करण्यात आले. या कार्यक्रमात महिला व बालकल्याणाच्या विविध योजनांबद्दल माहिती देण्यात आली तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा परिषद सदस्या सरिता सुतार, पंचायत समिती सदस्या रेखा तरे, वेढी गावचे सरपंच नचिकेत पाटील, उपसरपंच अभिजीत पाटील, तसेच विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य कार्यक्रमासाठी उपस्थित होते. वीट भट्टी व गावातील सुमारे १०० महिला, बालके आणि किशोरी मुलींनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन मा. CDPO अमोल पवार यांनी केले. मुख्यसेविका सुरेखा सूरवसे यांनी महिला व बालकल्याणाच्या योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. लायन्स क्लब केळवा विभागाचे अध्यक्ष डॉ. हर्षल यांच्या सहकार्याने उपस्थित लाभार्थ्यांना स्वच्छता किटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात वीट भट्टीवरील पाचवी ते दहावीपर्यंत शिकलेल्या किशोरी मुलींना वाचन साहित्य भेट देण्यात आले. तसेच THR (Take Home Ration) पासून तयार केलेल्या विविध पाककृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले. महिलांना ग्रामपंचायत वेढीच्या वतीने ज्यूट बॅग देऊन गौरविण्यात आले. अंगणवाडी सेविकांनी व्यसनमुक्ती, शाळागळती आणि पोषण आहार या विषयांवर पथनाट्य सादर करून प्रबोधन केले.प्राथमिक आरोग्य केंद्र एडवनमार्फत लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप वीट भट्टीवरील महिला व मुलांनी सादर केलेल्या पारंपरिक तारपा नृत्याने करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत वेढी, विटभट्टी मालक सागर कवळी, आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार व प्रकल्प अधिकारी अमोल पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन कल्पना पिंपळे यांनी केले. त्यांच्या कार्याबद्दल व एकात्मिक बाल विकास विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्या यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन कौतुक करण्यात आले.

# ऐतिहासिक वैशाखरे गावाला बस थांबा देण्याची मागणी !

## रस्ते मार्गावर वैशाखरे गावाचा उल्लेख करावा सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांची मागणी !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

कल्याण जुन्नर पैठण असा अडीच हजार वर्षांपूर्वी भारताच्या इतिहासात या मार्गाची नोंद व या मार्गावर असलेल्या नाणेघाटाच्या पायथ्याशी असलेल्या वैशाख खरे या गावाला मुरबाड तालुक्यातील पहिली बस सेवा सुरू होण्याचा मान मिळाला होता परंतु अशा ह्या ऐतिहासिक वैशाखरे गावाचा कल्याण अहिल्यानगर पूर्वीचे अहमदनगर या मार्गावर दिशादर्शक खडकावर उल्लेख नसल्याने तो उल्लेख करण्यात यावा अशी विनंती वजा मागणी तालुक्यातील करचोंडे गावचे सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांनी केली आहे

कल्याण मुरबाड वैशाखरे घाटघर जुन्नर नेवासा पैठण असा व्यापारी मार्ग भारताच्या इतिहासात नमूद आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी ज्या गावाची नोंद झाली ते नाणेघाटाच्या पायथ्याशी असलेले इतिहास प्रसिद्ध गाव म्हणजे वैशाखरे वैश्य खेडे याचा अपभ् रस्



होऊन वैशाख खरे झाले मराठीचा पहिला शिलालेख नाणेघाटात सापडतो त्यास नाणेघाटाच्या पायथ्याशी वैशाखरे गाव लागते व्यापारी वर्गासाठी त्या ठिकाणी राहण्याची सोय होती त्यासाठी इमारती बांधण्यात आल्या असा उल्लेख इतिहासात सापडतो अशा प्राचीन उल्लेख असलेल्या गावाच्या मात्र राष्ट्रीय महामार्ग कल्याण अहिल्यानगर क्रमांक ६१ वर कल्याण पासून कुठे कुठेही उल्लेख दिसत नाही किलोमीटर अंतरामध्ये ज्या गावांची नावे लिहिण्यात आली आहेत त्या गावांच्या यादीमध्ये वैशाखरे गावाचा सुद्धा उल्लेख व्हायला हवा अशी मागणी रमेश घरत यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला केली आहे राज्याचे सांस्कृतिक मंत्री पर्यटन मंत्री, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग, तसेच राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी खात्याने याची दखल घ्यावी अशी विनंती रमेश घरत यांनी केली आहे. मुरबाड तालुक्यात जी पहिली एसटी बस धावली ती वैशाखरे गावापर्यंत सुरू होती ही बस मुरबाड आजारातून चालू करण्यात आली होती विशेष बाब म्हणजे १९८० पर्यंत वैशाखरे गावाला माळशेज मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या सुद्धा थांबत असत परंतु नंतरच्या काळात टोकावडे येथे एसटीच्या अधिकृत थांबा झाल्यानंतर वैशाखरे येथे बस थांबणे बंद झाले तसेच वैशाखरे गावाची बस सेवा सुद्धा बंद करण्यात आली विशेष बाब म्हणजे अशी भारताच्या इतिहासात महत्वपूर्ण गावाचा उल्लेख प्राचीन महामार्गावरील गाव म्हणून वैशाखरेचा होतो त्या वैशाखरे नाम फलकावर तसेच वैशाखरे गावाचं नाव फलक लावण्याबाबत सर्वांनाच विसर पडल्याचे दिसून येत आहे.

> ‘वैशाखरे गावाच्या वेशीवर बनवण्यात आलेली कमान तर गावामध्ये जाणार आहे. रस्ता अडीच हजार वर्षांपूर्वी कल्याण जुन्नर पैठण मार्गावरील ऐतिहासिक गाव म्हणून वैशाखरे गावाचा इतिहासामध्ये उल्लेख आहे.
> ‘अडीच हजार वर्षांपूर्वी कल्याण मुरबाड वैशाखरे घाटघर जुन्नर पैठण नेवासा असा व्यापारी मार्ग नाणेघाट होता. या व्यापारी मार्गावरील महत्वाचे व्यापारी गाव म्हणून वैशाखरे गावाचा भारताच्या इतिहासामध्ये उल्लेख होतो.
> - रमेश घरत,सामाजिक कार्यकर्ते
> पेंढरी/मुरबाड



# मिरा भाईंदर महापालिकेच्या ताफ्यात अत्याधुनिक सक्शन आणि जेटींग मशीन दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मिरा भाईंदर शहरातील मलजल वाहिन्या, भूमिगत गटार, सेफ्टी टॅंक आणि मलजल संकलन केंद्रांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकच्या ताफ्यात अत्याधुनिक सक्शन आणि जेटींग मशीन दाखल झाल्या आहेत. त्यातील एक मशीन ८ टन तर दुसरी मशीन १८.५ टन एवढ्या वजनाची आहे. या मशिनीमुळे, स्वच्छता परिणामकारक होणार आहे शिवाय कर्मचाऱ्यांना देखील सुरक्षितपणे काम करता येणार आहे. या यंत्रांच्या वापरामुळे स्वच्छता कर्मचाय़ांच्या आरोग्य सुरक्षिततेत हा एक मोठा बदल नक्कीच होणार असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी व्यक्त केला आहे.

# एमडी सोबत एकाला अटक

कल्याण(प्रतिनिधी)

अंमली पदार्थ विरोधात पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या पथकाने मोठी कारवाई केली असून ३४ ग्राम एमडी सोबत एकाला अटक करण्यात आली आहे. विनय अय्यर असे अटक आरोपीचे नाव असून विनय हा डोंबिवलीतील नामांकित शाळा आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांना एमडी ड्रग विकतो. गेल्या चार दिवसांत कल्याण डोंबिवलीतील विविध ठिकाणाहून गांजा देखील जप्त करण्यात आला आहे.
परिमंडळ ३ चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांच्या कार्यक्षेत्रात १ जानेवारी ते १० जानेवारी या कालावधी मध्ये अंमली पदार्थ विरोधी कायदया अंतर्गत तसेच इतर कायदयान्वये परिमंडळ ३ स्थरावर स्वतंत्र पथक नेमुन कारवाई करण्यात आली. या कारवाईत शुक्रवारी रात्री १ वाजण्याच्या सुमारास डोंबिवली पूर्वेतील नंदी पॅलेस



हॉटेल जवळ, एम.आय.डी.सी रोडवर विनय अय्यर, वय २६ वर्षे, हा संशयास्पत रित्या मिळुन आल्याने त्यांच्याकडे विचारपुस करता त्यांच्याकडे 'मेफेड्रॉन' (एमडी) हा अंमली पदार्थ असल्याचे सांगितल्याने. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असुन त्यांच्याकडुन विक्रीसाठी घेवुन आलेला ३४ ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन' (एमडी) हा अंमली पदार्थ जप्त करून मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# पेण तालुक्यातील गावपाडयांसाठी पाणी टंचाई कृती आराखडा

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)

पेण तालुक्यातील वाशी-खारेपाट विभाग स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. काही गावांमध्ये सध्या टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रशासनाकडून पाणीटंचाईचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.
पेण पंचायत समितीच्या माध्यमातून २०२५-२६ या वर्षाकरिता तालुक्यातील १६० वाड्या आणि ३६ गावांसाठी जवळपास एक कोटी ८९ लाख ५० हजार रुपयांचा पाणीपुरवठा आराखडा तयार करून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे; मात्र तरीही सर्व गावांची तहान भागणार का, असा प्रश्न टंचाईग्रस्त गाव-वाड्यांतील नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.
तालुक्यातील वाशी, वढाव,भाल, काळेश्री, विठ्ठलवाडी, बोझें लाखोले, बहिराम कोटक, तामसीबंदर, तुकाराम वाडी, कान्होबा या गावांसह येथील अनेक वाड्या-वस्त्या वर्षानुवर्षे पाणीटंचाईला सामोऱ्या जात आहेत. राज्य सरकारने या विभागातील पाणीसमस्या दूर व्हावी, म्हणून आतापर्यंत कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिला आहे; मात्र टंचाई निकाली काढण्यात अद्याप प्रशासनाला यश आलेले नाही.

**अनेक वर्षांपासून खारेपाटाच्या टंचाईग्रस्त गावांसाठी पाणीपुरवठा आराखडा तयार करण्यात येतो; मात्र टँकरद्वारे येणारे पाणी किती नागरिकांपर्यंत पोहोचते, हेही पाहणे महत्त्वाचे आहे. कोट्यवधींचे आराखडे तयार होत असले तरी पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.**
**- प्रकाश माळी, अध्यक्ष, खारेपाट विकास संकल्प संघटना, पेण**

यावर्षी खारेपाट विभागासाठी पेण पंचायत समिती प्रशासनाकडून १६० वाड्या आणि ३६ गावांना टँकर व बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा तसेच विहिरी दुरुस्ती करणे यासह इतर कामांकरिता एक कोटी ८९ लाख ५० हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आराखड्याला मंजुरी मिळताच टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करणार असल्याची माहिती पंचायत समितीकडून देण्यात आली आहे.

# जलधी क्षेत्रात नियंत्रणासाठी ड्रोनचा वापर

## राज्यातील ०७ सागरी जिल्ह्यातील ०९ ठिकाणी पहिल्या ड्रोन प्रणालीचे उड्डाण

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/रायगड(प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत. अत्याधुनिक ड्रोन प्रणालीद्वारे सागरी सीमांवर नजर ठेण्यात येणार असून या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन मस्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे झाले. यावेळी अलिबागजवळ वरसोली बीच येथे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी डॉ.भरात बास्टेवाड यांच्या उपस्थितीत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते ड्रोन प्रणालीला हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले.
त्याचबरोबर श्रीवर्धन तालुक्यातील मूळगाव जेट्टीवरून देखील ड्रोन प्रणालीचे उड्डाण करण्यात आले. यावेळी तेथे कोस्टगार्ड विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांच्यासह अलिबाग येथील मत्स्य सहकारी संस्थांचे, संघाचे प्रतिनिधी, नौका मालक उपस्थित होते.
महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन सुधारीत कायदा अंमलात आणला आहे. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता विभागाकडे असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते. गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होत असते.
रायगडसह कोकणातील सात जिल्ह्यात अत्याधुनिक ड्रोन प्रणालीद्वारे सागरी सीमांवर नजर ठेवण्यात येणार आहे. गस्ती नौके सोबतच राज्याच्या जलधी क्षेत्रात नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केल्यास अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अशा नौकांवर सागरी कायद्यांतर्गत कठोरपणे कारवाई करणे सोईचे होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळेस अधिकचे क्षेत्र ड्रोनद्वारे देखरेखीखाली येण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची Mapping करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होवू शकेल, ड्रोनद्वारे राज्याच्या किनारपट्टीवरील क्षेत्र देखरेखीखाली येणार असल्याने हे ड्रोन सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार आहेत, जेणे करुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास सुध्दा मदत होईल. अनधिकृत मासेमारीस आळा घालून शाश्वत मासेमारी टिकून राहण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय सागरी सुरक्षा व सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्याच्या जलधी क्षेत्रात ड्रोनद्वारे देखरेख ठेवून मासेमारीचे नियमन करण्याकरीता ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली भाडेपट्टीने घेण्यात आले आहेत.
ड्रोन प्रणालीद्वारे रायगड जिल्ह्याच्या १२२ किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यापासून राज्याच्या सागरी हद्दीपर्यंत म्हणजे १२ सागरी मैल अंतरापर्यंत ड्रोनद्वारे महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारीत २०२१) च्या कायद्याची अंमल बजावणी करण्याकरिता वापर करण्यात येणार आहे. या ड्रोन प्रणालीद्वारे अनाधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर नजर ठेवून अशा नौकांची माहिती पुराव्यासह उपलब्ध करून कार्यवाही करण्याकरिता ड्रोन प्रणालीच्या वेबसोलूशन/स्ट्रिमींगचा पुरावा म्हणून वापर करण्यात येणार आहे.
रायगड जिल्ह्यातील रेवदंडा व श्रीवर्धन या दोन ठिकाणी सेवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात ड्रोन आधारीत देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणालीचा नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) कार्यान्वित करण्यात आला आहे.

# प्लास्टिकविरोधात केडीएमसीची धडक कारवाई

## फुलमार्केटमधून ५०० किलो प्लास्टिक जप्त

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी कल्याण डोंबिवली परिसरातील प्रदुषणात भर घालणा-या सिंगल युज प्लास्टिक वापरावर बंदी घालण्याच्या अनुषंगाने सिंगल युज प्लास्टिक विरोधी मोहिम तीव्र करण्याबाबतचे निर्देश घनकचरा व्यवस्थापन विभागास दिले होते.
त्याअनुषंगाने गत आठवड्यात अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी महापालिकेचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांची बैठक घेवून, सर्व उपस्थित अधिका-यांना तसेच महा पालिकेच्या सर्व प्रभागांच्या सहा. आयुक्तांना सिंगल युज प्लास्टिक विरोधी मोहिम राबविणेबाबत



सक्त निर्देश दिले होते. त्यानुसार मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलूरकर, ३/क प्रभागाचे स्वच्छता अधिकारी संदिप किस्मतराव, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ वड्डे व त्यांच्या पथकाने, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी उपेंद्र कुलकर्णी आणि राजेश नांदगांवकर, राजेंद्र राजपुत, जयंत कदम यांचे समवेत कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केटमध्ये पाहणी करुन सुमारे ५०० किलो प्लास्टिक जप्त करण्याची धडक कारवाई केली. कृषी उत्पन्न बाजार समितीतील फुल मार्केटमधील रामनाथ गुप्ता यांचे फ्लॉवर शॉपमध्ये मोठ्या प्रमाणात सिंगल युज प्लास्टिक आढळून आल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई प्रस्तावित केल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील यांनी दिली.
प्लास्टिकमुळे शहरातील पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे यापुढे सिंगल युज प्लास्टिकचा वापर आढळल्यास महापालिकेमार्फत दंडात्मक कारवाई केली जाईल. आणि ही मोहिम अधिकाधिक तीव्र केली जाणार असून, यापुढे नागरिकांनी, व्यापारी संघटनांनी सिंगल युज प्लास्टिक ऐवजी कागद वा कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी केले आहे. सदर प्लास्टिक बारावे प्लांन्ट येथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांसमवेत शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.

# पत्रकार हा समाजाचा आरसा





## पेण तालुक्यात पत्रकार दिन साजरा

**- पोलिस निरीक्षक संदीप बागुल**

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

पेण पत्रकार आणि पोलीस या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महानगरातील पत्रकारिता आणि पेणमधील पत्रकारिता यात जमीन आसमानाचा फरक आहे. यूट्यूब न्यूजच्या जमान्यातदेखील पेणमधील पत्रकार एखाद्या बातमीची पूर्ण खातरजमा केल्याशिवाय बातमी लावत नाहीत. पत्रकार हा समाजाचा आरसा आहे, ते आमच्या चुका दाखवतात आणि आम्ही एखादे काम उत्तम केल्यास तत्परतने कौतुक करतात. पोलीस आणि पत्रकार यांनी हातात हात घालून काम करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केले.
मराठी पत्रकार दिन पेण तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पेण गांधी वाचनालय येथे रोटरी क्लबच्या माध्यमातून पेण तालुक्यातील सर्व पत्रकारांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.
कामगार नेते राजन लाड यांच्या फार्म हाऊस धावटे येथे सायंकाळी पेण येथील सर्व पत्रकारांसाठी स्नेहसंमेलन झाले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड, मंगेश नेने, प्रसिद्ध उद्योजक राजू पिचिका, प्रसिद्ध उद्योजक तथा कामगार नेते राजन लाड, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल व सामाजिक कार्यकर्ते दिनेश पाटील हे उपस्थित होते.प्रथम 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकरांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संतोष पाटील यांनी केले.
सुज्ञेश सुनील फुणगे या सात वर्षांच्या विद्यार्थ्याने कळसुबाई शिखर यशस्वी पुणे सर केल्याबद्दल त्याचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत पाटील, विजय मोकल आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथीमध्ये उद्योजक राजू पिचिका यांनी सदैव पत्रकारांच्या बरोबर राहण्याचे अभिवचन दिले, कामगार नेते राजन लाड यांनी पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले. पत्रकारांच्या कार्यक्रमासाठी माझे फार्म हाऊस विनामूल्य उपलब्ध करून दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले. ॲड, मंगेश नेने यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या, या वेळी सर्व पत्रकारांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या. सर्वांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

ठाणे जिल्हा परिषदेच्या भ्रष्ट कारभाराविरोधात

# योगिता शिर्के यांचे आमरण उपोषण




दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
मुरबाडा(प्रतिनिधी)

ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाच्या भ्रष्ट आणि भोंगळ कारभारा विरोधात मुरबाड येथिल सामाजिक कार्यकर्त्या तथा माहिती अधिकार फेडरेशनच्या मुरबाड महिला तालुका अध्यक्षा योगिता शिर्के यांनी उपोषणाचे हत्यार उगारले असून विविध विषयांवर संदर्भात न्याय मिळत नसल्याने अखेर जिल्हा परिषद ठाणे येथे उपोषणाला बसल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने महिला व बालकल्याण विभागाच्या अंगणवाडी केंद्र नढई येथिल सेविकेला २०२१ पासून सेवेत नसताना दिला गेलेला पगाराची चौकशी व्हावी, अंगणवाडी केंद्र बळेगाव येथिल मदतनीस पदाच्या नियुक्ति बाबत पात्र ठरलेल्या अर्जदारास ७-८ वर्ष वंचित ठेवणार्या अधिकार्यावर निलंबनाची कारवाई व्हावी, प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोशी येथिल सन २०२० पासून ते आजपर्यत प्राप्त झालेल्या निधीचे विशेष लेखापरीक्षण करावे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र सरळगाव येथिल लाभार्थ्यांना सोनोग्राफीसाठी प्राप्त झालेल्या अनुदानाचे पैसे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः च्या नावावर चेक काढून स्वतःच्या बँक खात्यात वटवने अशा विविध मागण्यांसाठी ठाणे जिल्हा परिषदे समोर आमरण उपोषणाला बसल्या असून यापूर्वी अनेक वेळा तक्रारी, अर्ज विनंत्या करून न्यायन मिळाल्याने अखेर उपोषणाचे हत्यार उगारले असून माहिती अधिकार फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपोषण सुरू असून या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी फेडरेशनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर वडवले, अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचे आण्णा साळवे, शहापूर तालुका अध्यक्ष देविदास जाधव, मुरबाड अध्यक्ष दिलीप पवार, भिवंडी अध्यक्ष शांताराम पाटिल, पुष्पा पवार, रुपाली जाधव, दयानंद उल्मिक, सोमनाथ पोगेरे, कैलास भोईर, योगेश त्रिभुवन यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

# स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
रायगड(प्रतिनिधी)

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या मंत्राल यीन विभागाअंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचाल नलाय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या सुचनांन्वये महाराष्ट्र भूषण डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल या संस्थेमध्ये दि.१२ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिना साजरा करण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य, महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,पनवेल नि.के.चौधरी यांनी दिली आहे. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या सुचनांन्वये या युवा दिन कार्यक्रमामध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल या संस्थेतून आपले प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उद्योजक म्हणून नावारुपास आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. तसेच युवा सशक्तीकरण, मानसिक आरोग्य, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, त्याचप्रमाणे उद्योजक म्हणून नावारुपास आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या माध्यमातून त्याच्या यशोगाथा व स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन आणि नेतृत्व विकास यावर चर्चा होणार आहे.

# बल्याणी प्रभागात अडीच कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

## आदर्श शाळा म्हणून उभार्णी शाळेची गणती होईल

**- मयूर पाटील**

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

आदर्श शाळा म्हणून उभार्णी शाळेची गणती होईल असे मत केडीएमसीचे माजी नगरसेवक मयूर पाटील यांनी व्यक्त केले. कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील बल्याणी प्रभागात विकास कामांचा धडाका सुरू असून माजी नगरसेविका नमिता पाटील व मयूर पाटील यांच्या माध्यमातून विविध पायाभूत सुविधांचा शुभारंभ केला जात आहे. याच अनुषंगाने गुरुवारी बल्याणी प्रभागातील



उभार्णी येथील महापालिकेच्या शाळेत वर्ग खोल्या तयार करणं त्याचबरोबर बल्याणी गावात कॉंक्रिट रस्ता व गटार बनविण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले त्यावेळी मयूर पाटील बोलत होते.
केडीएमसीत प्रशासकीय राजवट असली तरी निवडणुकीत नागरिकांना दिलेल्या वचनांची पूर्तता करण्याकरता माजी नगरसेवक मयूर पाटील आणि नमिता पाटील या नेहमी विशेष प्रयत्न करत असतात. याबाबत मयूर पाटील यांनी सांगितले की शिक्षण समिती सभापती असताना नमिता पाटील यांनी बल्याणी, उभार्णी परिसरातील शाळा सुधारित कशा करता येतील यावर विशेष लक्ष दिलं होतं. त्याचाच फळ म्हणून उंभारणीच्या आरक्षित भूखंडावर उर्दू शाळा उभारण्यात आली होती. विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता या शाळेत आणखी १३ वर्ग खोल्या नव्यानं उभारल्या जाणार आहेत. या कामासाठी महा पालिकेकडून १ कोटी ६५ लाख रुपय निधीची तरतूद करण्यात आली असून शाळेतील शिक्षक व शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भूमिपूजन सोहळा पार पडला.
त्याचबरोबर बल्याणी गावात सिद्धार्थ जाधव यांच्या घरापासून ते टावर पर्यंत जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने स्थानिक नागरिकांना येजा करिता अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांची समस्या लक्षात घेता ७५ लाखांची निधीतून या ठिकाणी सीसी रस्ता व गटार तयार करण्यात येणार आहे. या भूमिपूजन सोहळयात शिवाजी गोंधळे, अरविंद पाटील, महेश पाटील, अरफात गुजर, राजू पाटील, जक्की पाकुर्डे, भरत मढवी, दशरथ गायकर, देवेंद्र गोंधळे, सुरज पावशे, प्रदीप घाणेकर, सिद्धार्थ जाधव, दिनेश जाधव, संदेश जाधव आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.
शिवसेना पक्षाचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, युवा खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कडे वारंवार विकास निधीसाठी पाठ पुरावा केला होता. त्यांनी लक्ष दिले, तसेच आमदार विश्वनाथ भोईर यांनी देखील आमच्या प्रभागात तसेच आसपास च्या प्रभागात भरघोस निधी देऊन येथील समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला असल्याचे यावेळी मयूर पाटील यांनी सांगितले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी